# वसई विरार शहर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दिनांक २९ /०५/२०१७

## दु ११.३० वा.

| अ़ु. क्र. | विषयाचे नाव | स्थायी समिती सभेचा निर्णय |
|---|---|---|
| १. | **मागील मा. स्थायी समिती सभा दि. १६/०५/२०१७ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.** | **ठराव** :- मागील मा. स्थायी समिती सभा दि. १६/०५/२०१७ रोजीचे इतिवृत्त दुरुस्तीसह कायम करणेंत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.पंकज पाटील सूचक :- मा.श्री. चंद्रकांत गोरीवले**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| २ | **महानगरपालिका हद्दीत विविध ठिकाणी बालमेळावेचे आयोजन करणे कामी प्राप्त निविदापैकी लघुत्तम दराची निविदा मंजुर करुन सविदा करण्यास मान्यता मिळणे बाबत.** | **ठराव** :- महानगरपालिका हद्दीत विविध ठिकाणी बालमेळावे आयोजन करणे कामी लागणारे सर्व साहित्य इच्छुक ठेकेदारा मार्फत पुरवठा करून बालमेळावेचे आयोजन करणेकामी प्राप्त प्रती मेळावा सर्वात कमी दर रक्कम रू. ८२,८००/- दरांस ही सभा मंजूरी देत आहे. याकामी मंजूर निविदा धारका बरोबर करारनामा करून संविदा करून मंजूर ठेकेदारास आदेशित करण्यांत यावे. याकरीता महानगरपालिका हद्दीत एकूण विविध ३५ ठिकाणी बालमेळाव्याच्या आयोजनाकरीता अंदाजे येणाऱ्या ३१,५०,०००/- रू. येणाऱ्या खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.सुनील आचोळकर सूचक :- मा.श्री. किशोर पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ३ | **वसई- विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती - 'अे' अंतर्गत येणाऱ्या बोळींज विभाग येथिल दैनंदिन बाजारकर लिलालावाची जादा दराची ई-निविदा मंजुर करणे बाबत.** | **ठराव** :- वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती-अे, अंतर्गत येणाऱ्या बोळींज विभागात दैनंदिन बाजार वसुलीकामी प्राप्त झालेल्या वरील निविदेपैकी अ.क्र. २ श्री.मंदार पिंपळे यांची निविदा रक्कम रू. ९,८०,०२१/- सर्वात जास्त आहे. तसेच १५% सेवाकर रू. १,४७,००३/- असे एकूण रक्कम रू. ११,२७,०२४/- (अक्षरी अकरा लाख सत्ताविस हजार चोविस रू.मात्र) एवढ्या जास्त रक्कमेची ई-निविदा मंजूर करणेस ही सभा प्रशासकीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. अजीत नाईक सूचक :- मा.श्री. चंद्रकांत गोरीवले**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ४ | **सन २०१७-१८ या वित्तीय वर्षाकरिता विभागीय कार्यालय विरार पूर्व येथील दैनंदिन बाजार व आठवडे बाजार फी** | **ठराव** :- सदर विषयाबाबत साधक-बाधक चर्चा करण्यांत आली. विरार पूर्व येथील दैनंदिन बाजार व आठवडे बाजार फी वसुलीकामी प्राप्त झालेल्या वरील निविदांपैकी श्री. मेहुल अरविंद वर्तक यांची रक्कम रू. ८१,००,७८३/- ही सर्वात जास्त दराची निविदा व सदर निविदेच्या रक्कमेवर नियमावली नुसार लागू होणारा सेवा कर वसुल करणेंस ही सभा मान्यता देत |

| | | |
|---|---|---|
| | **वसुलीसाठी प्राप्त झालेल्या निविदा दराबाबत.** | असून सदर जास्त निविदा धारकांसोबत संविदा करणेंस मान्यत देणेंत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. किशोर पाटील सूचक :- मा.श्री. राजेंद्र कांबळी**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ५ | **वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती 'जी' गोखिवरे कार्यक्षेत्रातील दैनंदिन बाजार शुल्क ठेका पध्दतीने करणेसाठी निविदा प्रकियेस मान्यता मिळणेबाबत.** | **ठराव** :- सदर विषयाबाबत सविस्तर चर्चा होऊन प्राप्त निविदांपैकी अ.क्र.२ रेचल ट्रेडर्स यांची निविदा जास्त दराची निविदा आहे. सन २०१७-१८ या वर्षासाठी रेचल ट्रेडर्स यांच्या रक्कम रु.३३,३९,९३०/- ही सर्वात जास्त दराची निविदा व सदर निविदेच्या रक्कमेवर नियमावलीनुसार लागू होणारा सेवा कर वसुल करणेंस सभा मान्यता देत आहे. लन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरीता महानगरपालिकेच्या अटी व शर्तीस अधिन राहून गोखिवरे विभाग कार्यक्षेत्रातील दैनदिन बाजार कर वसुली वार्षिक ठेका देण्यास पुढील आदेश होईपर्यंत आजची सभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. सुनील आचोळकर सूचक :- मा.श्री. अफिफ शेख**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ६ | **अग्निशमन विभागातील कर्मचारी ग्रुप विमा हप्ता रक्कम भरणे कामी केलेल्य कार्यवाहीस मंजुरी बाबत.** | **ठराव** :- अग्निशमन विभागातील कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना आग विझवतांना इजा, दुखापत अथवा दुर्दैवी प्रसंग ओढविल्यास अपंगत्व अथवा मृत्यु आल्यास जवानांचे कुटूंब उघड्यावर पडू नये व त्यांच्या वारसांना सुरक्षा म्हणून काही रक्कम मिळावी याकरीता अग्नीशमन विभागातील कर्मचाऱ्यांचा ग्रुप विमा काढणे कामी व विमा हप्ता रक्कम रु.८,८९,६५२/- भरणा करणेकामी केलल्या कार्यवाहीस ही सभा मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. राजेंद्र कांबळी सूचक :- मा.श्री. किशोर पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ७ | **वसई विरार शहर पाणी पुरवठा योजनेतील उसगाव उद्‌चंन विहिरीतील एक Jyoti Make Model/B4 50D/1 Stage 125 H.P व शिरवली उद्‌चंन विहिरीतील एक WPIL Make Model 19 TMC/1 Stage 175 H.P अशा एकूण २ पंपाची ओव्हर ऑयलींग करणे व आवश्यक दुरुस्ती करुन पंपाचा डिस्चार्ज वाढविणे कामी प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळणेबाबत.** | **ठराव :-** वरीलप्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त नमुद कामास अंदाजित रक्कमेस प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देण्यांत येत आहे व पुढील निविदा कार्यवाही करण्यास मान्यता देण्यांत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. चंद्रकांत गोरीवले सूचक :- मा.श्री. पंकज ठाकूर**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |